27-04-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 04/26/2025 10:59 PM Page 1

निवडक

आयसीसी स्पर्धांमध्ये भारताने पाक बरोबरखेळू नये : गांगुली

मुंबई, दि. २६ :

भारताने आयसीसी आणि आशियाई चॅम्पियनशिपमध्येही पाकिस्तानविरुद्ध खेळू नये, असे बीसीसीआयचे माजी अध्यक्ष सौरव गांगुली यांनी म्हटले आहे. पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात पाकिस्तानचे नाव समोर आल्यानंतर त्यांनी हे म्हटले. पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यात २६ जणांना आपला जीव गमवावा लागला. एजन्सीशी बोलताना गांगुली म्हणाले की, टीम इंडियाने कठोर कारवाई करावी आणि आयसीसीच्या स्पर्धांमध्येही पाकिस्तानविरुद्ध खेळू नये.

खरं तर, २०१३ पासून, बिघडत्या राजकीय संबंधांमुळे, दोन्ही देशांमधील द्विपक्षीय मालिका थांबल्या. भारत फक्त आयसीसी स्पर्धांमध्ये किंवा आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत पाकिस्तानशी खेळतो.

पाकिस्तानने शेवटचा २०१२-१३ मध्ये द्विपक्षीय मालिकेसाठी भारताचा दौरा केला होता. त्या दौऱ्यात ३ एकदिवसीय आणि २ टी२० सामन्यांची द्विपक्षीय मालिका खेळवण्यात आली. पाकिस्तानने एकदिवसीय मालिका २-१ ने जिंकली, तर टी-२० मालिका १-१ ने बरोबरीत राहिली.

टीम इंडियाने शेवटचा पाकिस्तान दौरा २००८ मध्ये केला होता. भारतीय संघाने ती ३ कसोटी सामन्यांची मालिका १-० ने जिंकली. या मालिकेतील २ सामने अनिर्णित राहिले. २०१२-१३ मध्ये, पाकिस्तानने भारत दौऱ्यावर एकदिवसीय मालिका २-१ ने जिंकली. या वर्षी मार्चमध्ये झालेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारताने पाकिस्तानचा दौरा केला नव्हता. भारताने अंतिम सामन्यासह सर्व सामने दुबईमध्ये खेळले. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडला हरवून भारताने १२ वर्षांनी विजेतेपद पटकावले.

मुंबई इंडियन्स विजयी लय कायम राखणार ?

लखनऊचे असणार आव्हान : रोहितकडून मोठ्या खेळीची अपेक्षा

मुंबई, दि. २६ : सुरुवातीच्या निराशाजनक कामगिरीनंतर नेहमीप्रमाणे शानदार पुनरागमन करणाऱ्या मुंबई इंडियन्सचा सामना रविवारी लखनऊ सुपर जायंट्सशी होईल. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर दुपारी ३:३० वाजता सामन्याला सुरुवात होईल.

मुंबई इंडियन्स हा सामना जिंकून आपला लय कायम ठेवण्याचा प्रयत्न करेल. त्याचवेळी, लखनऊ पुन्हा टॉप-४ मध्ये स्थान मिळविण्यासाठी प्रयत्नशील असेल. दोन्ही संघांचे आतापर्यंत समान १० गुण आहेत, परंतु चांगल्या नेट रन रेटच्या आधारावर मुंबई चौथ्या स्थानावर आहे तर लखनऊचा संघ सहाव्या स्थानावर आहे.

आतापर्यंत झालेल्या नऊ सामन्यांपैकी दोघांनीही पाच जिंकले आहेत आणि चार गमावले आहेत. विजयाव्यतिरिक्त, रिषभ पंतच्या नेतृत्वाखालील लखनऊ संघ भविष्यात महत्त्वाची भूमिका बजावू शकतो म्हणून त्यांचा नेट रन रेट सुधारण्याचा प्रयत्न करेल. वानखेडे स्टेडियमवर दोन्ही संघ वर्चस्वासाठी झुंजतील, तर मुंबईतील कडक उष्णता आणि आर्द्रता देखील प्रतिकूल परिस्थितीत सर्वोत्तम कामगिरी करण्याच्या खेळाडूंच्या तयारीची चाचणी घेण्यात भूमिका बजावेल.

लखनऊसाठी कर्णधार रिषभ पंतचा खराब फॉर्म चिंतेचा विषय आहे कारण त्याने आतापर्यंत नऊ सामन्यांमध्ये फक्त १०६ धावा केल्या आहेत. मुंबईच्या मजबूत गोलंदाजी आक्रमणासमोर त्याला कठीण परीक्षेला सामोरे जावे लागेल.

मुंबई संघाने योग्यवेळी शिखर गाठले आहे. त्याने सलग चार सामने जिंकून प्लेऑफच्या शर्यतीत स्वतःला पुढे ठेवले आहे आणि त्याचा संघ विजयी मालिका सुरू ठेवण्यासाठी वचनबद्ध असेल. त्याच्या संघाला येथील परिस्थितीची चांगली जाणीव आहे आणि ते त्याचा पुरेपूर फायदा घेण्याचा प्रयत्न करतील.

मुंबईचे प्रमुख खेळाडू रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, ट्रेंट बोल्ट आणि अगदी हार्दिक पांड्या हे देखील योग्यवेळी फॉर्ममध्ये परतले आहेत आणि कोणत्याही संघासाठी त्यांच्यावर मात करणे सोपे नसेल. चेन्नई सुपर किंग्ज आणि सनरायझर्स हैदराबाद विरुद्ध दोन स्फोटक अर्धशतकांसह रोहितने आपली लय मिळवली आहे आणि आता तो विरोधी संघांसाठी सर्वात मोठा धोका बनला आहे.

सूर्यकुमारबद्दल कोणतीही मोठी चिंता नसली तरी, आयपीएलच्या सुरुवातीलाच या अव्वल टी-२० फलंदाजाला त्याची परिचित चमक जाणवत नव्हती, परंतु उजव्या हाताचा हा फलंदाज तिलक वर्माप्रमाणे त्याची लय शोधण्यास सक्षम आहे.

हार्दिकने गोलंदाजी आणि फलंदाजी दोन्ही विभागात चांगली कामगिरी केली आहे तर वेगवान गोलंदाज दीपक चहर आणि ट्रेंट बोल्ट यांनी त्यांची भूमिका चांगली बजावली आहे. लखनऊच्या फलंदाजीचा विचार केला तर ते परदेशी खेळाडू निकोलस पूरन (३७७ धावा), मिशेल मार्श (३४४) आणि एडेन मार्कराम (३२६) यांच्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. लखनऊला पुन्हा एकदा या तिघांकडून उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा असेल. लखनऊमध्ये गोलंदाजी विभागात फारशी मोठी नावे नाहीत पण त्यांच्या गोलंदाजांनी आतापर्यंत परिस्थितीनुसार गोलंदाजी करून त्यांच्या संघाच्या मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्याच्याकडून, शार्दुल ठाकूरने सर्वाधिक १२ विकेट्स घेतल्या आहेत आणि स्थानिक खेळाडू असल्याने, त्याला येथील परिस्थितीची चांगली जाणीव आहे.

संभाव्य प्रतिस्पर्धी संघ :

मुंबई इंडियन्स : हार्दिक पांड्या, रोहित शर्मा, सूर्यकुमार यादव, रायन रिकेल्टन, बेव्हॉन जेकब्स, तिलक वर्मा, नमन धीर, विल जॅक्स, मिशेल सँटनर, ट्रेंट बोल्ट, कर्ण शर्मा, दीपक चहर, मुजीब उर रहमान.

लखनऊ सुपर जायंट्स : ऋषभ पंत, डेव्हिड मिलर, एडन मार्कराम, निकोलस पूरन, मिचेल मार्श, अब्दुल समद, शाहबाज अहमद, आयुष बडोनी, शार्दुल ठाकूर, आवेश खान, आकाश दीप, आकाश सिंग, रवी बिश्नोई.

लखनऊचे पारडे जड

मुंबई इंडियन्स विरुद्ध लखनऊ सुपर जायंट्स यांच्यामध्ये आतापर्यंत ७ सामने झाले आहेत. ही आकडेवारी पाहून सर्वांनाच धक्का बसेल. यामध्ये पाच वेळा आयपीएल विजेता संघ ६ वेळा लखनऊ सुपर जायंट्सविरुद्ध पराभूत झाला आहे तर १ वेळा मुंबई इंडियन्सचा संघ हा लढतीत जिंकला आहे. या दोघांमध्ये सर्वाधिक धावसंख्या २१४ इतकी आहे तर सर्वात कमी धावसंख्या १९६ इतकी आहे.

पॉईंट टेबलमध्ये दोन्ही संघाची स्थिती

गुणतालिकेबद्दल सांगायचे झाले तर लखनऊ सुपर जायंट्सचा संघ सध्या या शर्यतीत १० गुणांसह सहाव्या स्थानावर आहे. लखनऊ सुपर जायंट्सने ९ सामने खेळले आहे या हंगामामध्ये यामध्ये त्याने ५ सामन्यात विजय मिळाला आहे तर ४ सामन्यात त्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. मुंबई इंडियन्सची संघाची या स्पर्धेमध्ये सुरुवात चांगली झाली नाही. पण संघानी दमदार सुरुवात केली आहे, सलग चार सामन्यात विजय मिळवून टॉप चारमध्ये स्थान मिळवले आहे. रोहित शर्मा देखील सध्या दमदार फॉर्ममध्ये आहे, मागील दोन सामन्यात धुव्वादार फलंदाजी केली होती.

आरसीबी पराभवाचा बदला घेण्यासाठी सज्ज

दिल्लीविरुद्ध घरच्या मैदानावर रंगणार सामना : विराट कोहलीचे असणार आव्हान

नवी दिल्ली, दि. २६ : आयपीएल २०२५ चा ४६ वा सामना उद्या रविवारी दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात अरुण जेटली स्टेडियम, दिल्ली येथे खेळला जाईल. या सामन्यात आरसीबीला त्यांच्या घरच्या मैदानावर दिल्लीला हरवण्याची चांगली संधी असेल. या हंगामात दोन्ही संघांमधील पहिल्या सामन्यात, दिल्लीने आरसीबीला त्यांच्या घरच्या मैदानावर, एम चिन्नास्वामी स्टेडियमवर पराभूत केले. आता आरसीबीकडे बदला घेण्याची चांगली संधी असेल.

दिल्ली आणि आरसीबी सध्या खूप चांगल्या फॉर्ममध्ये आहेत आणि या हंगामात दोन्ही संघांची कामगिरी आतापर्यंत चांगली राहिली आहे. आरसीबीने गेल्या दोन सामन्यात विजय मिळवला आहे तर दिल्लीनेही शेवटचा सामना जिंकला आहे.

याचा अर्थ असा की दोन्ही संघ त्यांचे मागील सामने जिंकून या सामन्यात प्रवेश करतील आणि अर्थातच यामुळे दोघांचेही मनोबल वाढेल.

या हंगामात आरसीबीने घराबाहेर एकही सामना गमावलेला नाही तर दिल्लीने घरच्या मैदानावर आतापर्यंत खेळलेल्या दोन सामन्यांपैकी एक

जिंकला आहे आणि एक गमावला आहे. अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या सामन्यात मुंबईने दिल्लीचा पराभव केला तर राजस्थानला सुपर ओव्हरमध्ये अक्षर पटेलच्या संघाने पराभव पत्करावा लागला. आता दिल्लीला त्यांच्या घरच्या मैदानावर आरसीबीविरुद्ध खेळायचे आहे आणि अक्षरच्या संघासाठी रजत पाटीदारच्या संघाला पराभूत करणे सोपे जाणार नाही.

सध्या आरसीबीचे फलंदाज चांगले खेळत आहेत. फिल साल्ट फॉर्ममध्ये असताना, विराट कोहलीची बॅट सतत चांगली कामगिरी करत आहे. जर त्याची बॅट दिल्लीतही चालली तर कॅपिटल्ससाठी ते कठीण होऊ शकते. त्याचवेळी, देवदत्त पडिक्कल संघासाठी धावा काढण्यात यशस्वी झाला आहे. यानंतर, टीम डेव्हिड, जितेश शर्मा, रजत पाटीदार सारखे फलंदाज संघाची धुरा सांभाळण्यासाठी उपस्थित असतात.

संघाची गोलंदाजीही चांगली सुरू आहे आणि जोश हेझलवूड शानदार गोलंदाजी करत आहे. राजस्थानविरुद्धच्या शेवटच्या सामन्यात तो ४ विकेट घेत सामनावीर ठरला. याशिवाय संघात भुवनेश्वर कुमार आणि यश दयालसारखे वेगवान गोलंदाज आहेत, तर सुयश शर्मा आणि कृणाल पांड्या फिरकीची जबाबदारी सांभाळत आहेत.एकंदरीत, आरसीबी संघ चांगला दिसतोय, पण दिल्लीचा संघ कमकुवत नाही आणि या संघात अनेक मॅचविनर्स देखील आहेत. या संघात केएल राहुल, अभिषेक पोरेल, करुण नायर, अक्षर पटेल, कुलदीप यादव असे तगडे खेळाडू आहेत.

संभाव्य प्रतिस्पर्धी संघ :

रॉयल चॅलेंजर्स बेंगलोर : फिल सॉल्ट, विराट कोहली, देवदत्त पडिक्कल, रजत पाटीदार (कर्णधार), जितेश शर्मा (यष्टीरक्षक), टीम डेव्हिड, कृणाल पांड्या, रोमॅरियो शेफर्ड, भुवनेश्वर कुमार, जोश हेजलवूड, यश दयाल.

दिल्ली कॅपिट्लस : अभिषेक पोरेल, करुण नायर, केएल राहुल (यष्टीरक्षक), अक्षर पटेल (कर्णधार), ट्रिस्टन स्टब्स, आशुतोष शर्मा, विपराज निगम, मिचेल स्टार्क, कुलदीप यादव, दुष्मंथा चमीरा, मुकेश कुमार.

हैदराबादचा चेन्नईवर शानदार विजय

प्ले ऑफचे दोन्ही संघांचे आव्हान संपुष्टात

चेन्नई, दि. २६ : सनरायझर्स हैदराबादने आयपीएल २०२५ मध्ये चेन्नई सुपर किंग्सचा पराभव करत मोठा ऐतिहासिक विजय मिळवला आहे. हैदराबादने चेन्नईवर ५ विकेट्स आणि ८ चेंडू शिल्लक ठेवत विजयाची नोंद केली. फॉर्मात नसलेल्या नितीश रेड्डीने आणि कामिंदू मेंडिसने अखेरच्या षटकांमध्ये संघाला विजयापर्यंत नेले.

सनरायझर्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि मोहम्मद शमीने पहिल्याच चेंडूवर विकेट घेत संघाला चांगली सुरुवात करून दिली. यानंतर युवा फलंदाज आयुष म्हात्रेने जोरदार फटकेबाजी केली पण तोही पॉवरप्लेमध्ये बाद झाला आणि चेन्नईने फक्त ४७ धावांत ३ विकेट गमावल्या.

युवा फलंदाज डेवाल्ड ब्रेविसने संथ सुरुवातीनंतर आक्रमक फलंदाजी करत षटकारांचा पाऊस पाडला. पण कामिंदू मेंडिसच्या थक्क करणाऱ्या झेलमुळे तो पॅव्हेलियनमध्ये परतला. यानंतर, हर्षल पटेल आणि पॅट कमिन्स यांनी संघाला लवकर धावा करू दिल्या नाहीत आणि संघ १९.५ षटकांत १५४ धावांवर ऑलआउट झाला.

चेन्नईने दिलेल्या १५५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना हैदराबादची सुरुवातही फारशी चांगली झाली नाही. अभिषेक शर्माही खाते न उघडता पहिल्याच षटकात झेलबाद झाला. यानंतर ट्रॅव्हिस हेडही पॉवरप्लेच्या अखेरच्या षटकात झेलबाद झाला. यानंतर जडेजाने क्लासेनला झेलबाद केलं. इशान किशनने मधल्या षटकांमध्ये वादळी फलंदाजी करत संघासाठी महत्त्वपूर्ण धावा केल्या आणि ४४ धावांवर झेलबाद झाला. यानंतर अनिकेत वर्मा १९ धावा करत १४व्या षटकात बाद झाला. पण कामिंदू मेंडिस आणि नितीश रेड्डीने संघाला विजयापर्यंत नेले. कामिंदू मेंडिस २२ चेंडूत ३ चौकारांसह ३२ धावा करत नाबाद राहिला. तर नितीश रेड्डीने २ चौकारांसह १९ धावा करत चांगली साथ दिली. यासह हैदराबादने १८.४ षटकांत १५५ धावा करत सामन्यात शानदार विजय मिळवला.

या विजयासह हैदराबादचा संघ गुणतालिकेत आठव्या स्थानी पोहोचला आहे.

गुणतालिकेत अखेरच्या क्रमांकावर असलेल्या चेन्नई आणि हैदराबादमध्ये हा सामना खेळवला गेला. सनरायझर्सचा हा तिसरा विजय आहे आणि संघ पॉइंट्स टेबलमध्ये ९व्या स्थानावरून ८व्या स्थानावर पोहोचला आहे. चेन्नईचा संघ दहाव्या क्रमांकावर कायम आहे.

पाकिस्तानला धडा शिकवण्याची हीच योग्य वेळ

वाळपईतील पहलगाम दहशतवादी हल्ला निषेध कार्यक्रमात उमटला सुर

टीम दैनिक हेराल्ड

वाळपई, दि. २६ : भारताकडे सर्व प्रकारचे सामर्थ्य आणि शक्ती आहे. भारताने जर ठरवले तर पाकिस्तानला भारत जगाच्या नकाशावरून उद्ध्वस्त करू शकतो. सन १९४७ सालापासून पाकिस्तान भारताच्या विरोधात वारंवार युद्ध पुकारत आहे. पेहलगामच्या भ्याड दहशतवादी हल्ल्यामुळे आता पाणी डोक्यावरून गेले आहे. आणि म्हणून पाकिस्तानला कायमचा धडा शिकवण्याची हीच योग्य वेळ आहे असा सूर आज वाळपईत शहीद स्तंभाजवळ जम्मू काश्मीर येथील पेहलगाम मधील दहशतवाद्यांनी २६ जणांच्या केलेल्या क्रूर हत्येच्या विरोधातील देशप्रेमी नागरिकांच्या निषेध कार्यक्रमात उमटला.

या कार्यक्रमात कार्यक्रम निमंत्रक ॲड. शिवाजी देसाई, माजी भारतीय सैनिक रामनाथ गावडे, गोविंद बर्वे, दया तेंडुलकर, संजय तेंडुलकर, लक्ष्मण गावस, गोविंद कोरगावकर, दीपाजीराव राणे, गौरीश गावस, पत्रकार उदय सावंत, सपना सामंत, जितेंद्र काटकर, विजय गावकर, सखाराम गावकर, समीर बागी, प्रदीप गवडळकर, नकुळ वेळुस्कर, गौतमी चोरलेकर, मिलिंद गाडगीळ , वामनराव देसाई व इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते

ॲड. शिवाजी देसाई म्हणाले की, पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी लोकांना मारले त्यामागे त्यांचे सुनियोजित कारस्थान आहे. मुळात जम्मू आणि काश्मीरला भारतापासून पाकिस्तानला वेगळे करायचे आहे. जम्मू काश्मीर मध्ये भारताच्या इतर भागातील लोक जाऊ नये आणि भारतीयांमध्ये धार्मिक फूट घालण्यासाठी हा हल्ला आहे. भारतीयांनी सावध झाले पाहिजे. पाकिस्तानची आयएसआय ही संघटना वेगवेगळ्या प्रकारचे व्हिडिओ तयार करून सामाजिक माध्यमातून भारतात पाठवत आहे. हे व्हिडिओ धार्मिक क्लेश भारतात निर्माण करू शकतात. आणि त्यामुळे आपण सावध झाले पाहिजे.

गोविंद कोरगावकर म्हणाले की, दहशतवादाला पाठिंबा देणारे काहीजण आपल्या देशात पण आहेत. आज अशाना हुडकून काढण्याची गरज आहे. आणि त्यांना हुडकून काढून त्यांना शासन करणे गरजेचे आहे. भारतातील काही जण दहशतवादाला मुद्दामून पाठिंबा देत आहेत ही चिंतेची बाब आहे. आम्ही सगळेजण केंद्र सरकारच्या बरोबर आहोत.

गौरीश गावस म्हणाले की कश्मीर हा भारताचा अविभज्य भाग आहे. आणि पाकिस्तानचे मनसुबे कदापी यशस्वी होणार नाहीत. रामनाथ गावडे म्हणाले की जर आज माजी सैनिकांना युद्धामध्ये उतरता आले तर त्याकरिता आमची तयारी आहे. सरकारने आम्हाला आदेश द्यावे.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शहिदांना पुष्पांजली अर्पण करण्यात आली. सूत्रनिवेदन आणि आभार प्रदर्शन विजय गावकर यांनी केले. वंदे मातरमने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी पहलगाम मध्ये दहशतवाद्यांच्या हल्ल्यामुळे ज्यांनी प्राण गमावले त्या सर्वांना एक मिनिट स्तब्धता पाळून श्रद्धांजली वाहण्यात आली.

वाळपई : पेहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ येथील शहीद स्तंभाजवळ झालेल्या कार्यक्रमात ॲड. शिवाजी देसाई, रामनाथ गावडे, गोविंद बर्वे, गोविंद कोरगावकर, सखाराम गावकर, प्रदीप गवडळकर, समीर बागी, दया तेंडुलकर, संजय तेंडुलकर, लक्ष्मण गावस आणि इतर

आग लागलेल्या घराची पंचायत मंडळाकडून दुरुस्ती

टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. २६ : आग लागून मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या घराची पंचायत मंडळांनी पुढाकार घेऊन दुरुस्ती केली. मार्ना- शिवोली पंचायत मंडळाने केलेल्या या कार्याची सर्वत्र प्रशंसा केली जात आहे. दांडा शिवोली येथील अनिता शिरोडकर यांच्या राहत्या घराला काही दिवसांपूर्वी आग लागली होती. या आगीत घराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. या प्रकरणाची पंचायत मंडळाने दखल घेतली. सरपंच संदेश हडफडकर, स्थानिक पंचसदस्य अभय शिरोडकर, अमित मोरजकर, माजी उपसरपंच विघ्नेश चोडणकर, माजी पंचसदस्य महेश्वर गोवेकर यांच्या पुढाकाराने संपूर्ण घराची दुरुस्ती करण्यात आली. यासाठी पाच ते सहा लाख रुपये खर्च करण्यात आले. हा सर्व खर्च वर नमूद केलेल्या आजी माजी पंचसदस्यांनी केला. याबाबत बोलताना सरपंच हडफडकर म्हणाले, पंचायत क्षेत्रातील जनतेच्या कठीण प्रसंगी सहकार्य करण्याची जबाबदारी पंचायत मंडळाची असते. त्यानुसार मागेपुढे न पाहता पंचायत मंडळांनी आपल्या परीने मदत केली. गावातील अनेक समस्या सोडविण्याचा आमचा प्रयत्न असतो. त्यानुसार सर्व पंचायत मंडळ एकजुटीने काम करीत आहे. भविष्यातही सर्वांना मदत करण्याचा पंचायत मंडळाचा प्रयत्न असल्याचे सरपंचांनी स्पष्ट केले.

सरकारकडून दहा हजार रुपये

आगीत मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या अनिता शिरोडकर यांना सरकारकडून दहा हजार रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. या मदतीचा धनादेश सरपंच संदेश हडफडकर यांच्या उपस्थितीत शिरोडकर यांना प्रदान करण्यात आला.

RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक २३४ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 234 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .